दैनिक हेराल्ड | गोवा | बुधवार, १९ फेब्रुवारी २०२५ | 3

# सायबर गुन्हेगारीविरोधात व्यापक उपक्रमांना सुरुवात

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते समर्पित सायबर हेल्पलाइन सेंटर आणि एआय एमएल लॅबचे उद्घाटन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १८ :** मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते सायबर हेल्पलाइन सेंटर (१९३०) आणि एआय एमएल लॅबचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी गोवा पोलिसांसाठी क्विक पास मोबाईल ॲपतसेच सामान्य नागरिकांसाठी सायबर योद्धा उपक्रमाचेही लोकार्पण करण्यात आले. सायबर गुन्हेगारीविरोधी लढ्यात नागरिकांना सक्षम करण्याच्या उद्देशाने हे उपक्रम हाती घेण्यात आले असून, राज्यातील आधुनिक पोलिसिंगसाठी ही महत्त्वाची पावले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

नव्या सायबर हेल्पलाइन सेंटर (१९३०) द्वारे नागरिकांच्या तक्रारींचे त्वरित निवारण होणार असून, विशेष प्रशिक्षित सायबर सेल टीम याचे संचालन करणार आहे.एआय एमएल लॅब (आर्टिफिशियल इंटेलिजन्स – मशीन लर्निंग लॅब) ही अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने गुन्हे शोधण्यासाठी आणि तपासणी प्रक्रियेत क्रांतिकारी बदल घडविण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. क्विक पास मोबाईल ॲप ट्रॅफिक पोलिसांकडून वाहनचालकांना अडवण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणेल. हे ॲप ट्रॅफिक तपासणी दरम्यान क्युआर कोड जनरेट करेल, त्यामुळे नागरिकांना वारंवार अडवले जाणार नाही. सायबर गुन्ह्यांविषयी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी सायबर योद्धा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. आतापर्यंत १२ महाविद्यालये आणि स्वयंसेवी संस्थांमधील सुमारे १२० सायबर योद्ध्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. प्रशिक्षित सायबर स्वयंसेवक लोकांमध्ये सायबर सुरक्षेच्या उपाययोजनांविषयी जागरूकता निर्माण करण्याचे काम करतील.



यावेळी बोलताना मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी सायबर सुरक्षेच्या क्षेत्रात गोवा देशात आदर्श निर्माण करत असल्याचे नमूद केले. सायबर गुन्हे हे वेगाने वाढणारे धोके आहेत. नागरिकांनी सायबर फसवणुकीच्या घटनांबाबत जागरूक राहावे आणि कुठलीही संशयास्पद बाब आढळल्यास त्वरित तक्रार नोंदवावी, असे त्यांनी सांगितले.

क्विक पास हे भारतातील पहिल्यांदाच सादर होणारे अनोखे ॲप असून, ते ट्रॅफिक तपासणीची प्रक्रिया सुलभ करून पर्यटक आणि नागरिकांना अनावश्यक त्रास होण्यापासून वाचवेल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

गोव्याचे पोलिस महासंचालक आलोक कुमार यांनी यावेळी सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांविषयी चिंता व्यक्त केली. २०२४ मध्ये सायबर फसवणुकीच्या माध्यमातून तब्बल १०१ कोटी रुपयांची लूट झाली म्हणजे दरमहा सुमारे ९ कोटी रुपयांचे नुकसान होत आहे. आम्हाला हा आकडा ३० ते ४० टक्क्यांनी कमी करायचा आहे असे त्यांनी सांगितले. २०१३ मध्ये सायबर सेलला १७८८ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, तर २०२४ मध्ये हा आकडा २८४७ वर पोहोचला आहे.मात्र, यात फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ झाली असे नाही, तर नागरिक आता तक्रार नोंदवू लागले आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सायबर गुन्हे शाखेचे पोलिस अधीक्षक राहुल गुप्ता यांनी सायबर योद्धा उपक्रमाचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, प्रत्येक पोलीस ठाण्याच्या सायबर टीमला आणि बीट पोलिसांना जागरूकता मोहिमांसाठी सायबर योद्धे दिले जातील.

५०० प्रकरणे शोधण्यात आणि मदत करण्यात हातभार लावणाऱ्या योद्ध्यांना प्रमाणपत्र, आर्थिक बक्षिसे आणि प्रोत्साहन देण्यात येईल, असे गुप्ता यांनी सांगितले. गोव्यात सायबर सुरक्षेसाठी सरकार आणि पोलिसांनी पुढाकार घेतले असून, सायबर हेल्पलाइन, एआय एमएल लॅब, क्विक पास ॲप आणि सायबर योद्धा या उपक्रमांमुळे नागरिकांचे संरक्षण अधिक सक्षम होणार आहे. सायबर गुन्हे रोखण्यासाठी आणि सायबर सुरक्षिततेच्या दिशेने हे मोठे पाऊल ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

---

## निवडक

### धुमासे कोमुनिदादच्या अध्यक्षपदी नारायण नाईक



धुमासे : कोमुनिदाद समिती न्हानू नाईक, सद्गुरू नाईक, नारायण नाईक, बाबाजी नाईक, उदय नाईक व नारायण नाईक.

■ टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. १८ : डिचोली तालुक्यातील धुमासे कोमुनिदाद अध्यक्ष पदावर नारायण गणेश नाईक यांची बिनविरोध निवड झाली. खजिनदार पदी उदय यशवंत नाईक आणि मुखत्यारपदी न्हानू बाबलो नाईक यांची निवड झाली. तर उपाध्यक्षपदी बाबाजी आत्माराम नाईक आणि उपखजिनदार नारायण गंगाराम नाईक तर सद्गुरू गजानन नाईक यांची निवड झाली. संपूर्ण समितीची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी धुमासे कोमुनिदादचे सर्व सभासद उपस्थित होते. उपजिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी मनुजा परब यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रेमानंद राऊळ यांच्या निरीक्षणाखाली समिती निवड प्रक्रिया पार पडली.

---

### महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी, सर्वांसाठी खुली निबंध स्पर्धेचे आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १८ : गोवा विद्यापीठ, शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा, मराठी अध्ययन शाखा 'गोमंतक मराठी भाषा परिषद' आणि शारदा विद्यार्थी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी तसेच सर्वांसाठी खुली निबंध स्पर्धा आयोजित करीत असून, निबंधाचा विषय – 'अभिजात मराठी समृद्ध वारसा आणि वाटचाल' असा आहे.

नियम व अटी – १. निबंधाची शब्दमर्यादा १५०० शब्द. २. निबंध मराठी भाषेमध्येच असावा. ३. निबंध हा कागदाच्या एकाच बाजूने लिखित किंवा मुद्रित केलेला आणि सुस्पष्ट असावा. ४. एक स्पर्धक एकच निबंध पाठवू शकेल. ५. निबंध स्पर्धेसाठी स्पर्धा आयोजकांचा निर्णय अंतिम असेल. ६. स्पर्धकाने स्वतःचे नाव व संपर्क क्रमांक / ई–मेलमध्ये सुस्पष्ट नमूद करावा. निबंध पाठवण्याची अंतिम तारीख २४ फेब्रुवारी २०२५विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देण्यात येईल.निबंध Email ने किंवा Whatsapp ने पाठवावा.एरळश्र – sharadavidyarthimandalgmail.com कविता गावडे – ९३०९५२३४४८, चैतन्य शेवडे – ७४९८५०३९४३प्रथम पारितोषिक : २000 द्वितीय पारितोषिक : १000 तृतीय पारितोषिक : ५00.

---

### म्हापसा पालिकेच्या अनास्थेमुळे पाणी भरण्याचे प्रकार

■ टीम दैनिक हेराल्ड

**शिवोली, दि. १८** : म्हापसा पालिका क्षेत्र अंतर्गत कुचेली परिसरातील नाले ओहोळ वेळोवेळी साफ करत नसल्याने सडये परिसरात घरात पाणी भरण्याचा प्रकार होत असल्याचा दावा सडये पंचायत सरपंच दीपा पेडणेकर यांनी केला. याबाबत आमदारांनी पालिकेशी संपर्क साधून कामे करून घ्यावी अशी मागणी सरपंचांनी केली सडये परिसरातील घरामध्ये तिळारीच्या कालव्याचे पाणी भरल्याने घर मालकांना मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. एकूण अकरा घर मालकांना नुकसान भरपाई चे धनादेश आमदार दिलायला लोबो यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. यावेळी बोलताना सरपंच म्हणाल्या,कुचेली परिसरात पावसाळ्यापूर्वी नाले ओहोळाची सफाई करणे गरजेचे असते. सदर काम म्हापसा पालिकेने करायला हवे. परंतु पालिकेकडून दुर्लक्ष केले जाते. याचा फटका सडये येथील लोकांना बसत असल्याचा सरपंच म्हणाल्या.

यंदा स्थानिकांना कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊ नये यासाठी योग्य उपाययोजना वेळेत केली जाणार असल्याचे आमदार डिलायला लोबो यानी स्पष्ट केले. नुकसानग्रस्त घर मालकांना आर्थिक मदत देण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल मुख्यमंत्री तसेच जल स्त्रोत खात्याच्या मंत्र्यांचे आमदारनी आभार मानले. या कार्यक्रमाला पंच सदस्य ओमकार हरमलकर, शाहू कलंगुटकर व इतर उपस्थित होते.

---

### मडगावमध्ये श्वसन रोग तपासणी शिबिराचे आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

**नावेली, दि. १८** : वार्ताहर भारत सरकारने ७ डिसेंबर पासून राज्य तसेच जिल्हा पातळीवर १00 दिवसांची क्षयरोग मोहीम सुरू केली आहे. ही मोहीम गोव्यातही राज्य आणि जिल्हा पातळीवर सुरू करण्यात आली आहे. क्षयरोगाचे प्रमाण कमी करणे तसेच क्षयरोगामुळे होणाऱ्या वादहत्या मृत्युदरात घट करणे हे या मोहिमेचे उद्दीष्ट आहे.याच अनुषंगाने इनरव्हील क्लब ऑफ मडगाव आणि महिला मंडळ मडगाव तसेच अर्बन हेल्थ सेंटर मडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने श्वसन रोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर शिबिर राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमाचा एक भाग असून महिला मंडळ मडगाव च्या विमाला गो. कारे सभागृहात शनिवार ता. २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते १ या दरम्यान आयोजित करण्यात आले आहे.मधुमेही रुग्ण, ६0 वर्षांवरील धूम्रपान करणारे, मद्यपी , क्षयरोगाचे जुने रुग्ण, कमी बीएमआय असलेले आणि लक्षणे असलेले रुग्ण यांची तपासणी करणे अनिवार्य असून त्यांनी या शिबीराचा अवश्य लाभ घ्यावा. या शिबीरात छातीच्या एक्सरे ची आवश्यकता असलेल्यांची तपासणी केली जाईल. आणि ज्यांच्यात ही लक्षणे आढळतील , त्यांच्या थुंकीची तपासणी केली जाईल.प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार नोंदणी केली जाईल. नोंदणी साठी रिना पाणंदीकर (९९२३४७0७६९), राखी करापूरकर (९८२२१५९४६९) यांच्याशी संपर्क साधावा असे कळविण्यात आले आहे.

---

# धारगळ महाखाजन येथे ॲम्बुलन्स जळून खाक



धारगळ : आपत्कालीन वाहन जळून खाक.

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १८** : निलावडे सिंधुदुर्ग येथील एक पेशंटला सावंतवाडी हॉस्पिटल मधून बांबोळे येथे नेत असताना धारगळ महाखाजन येथे पहाटे तीन वाजता शॉर्टसर्किट होऊन पूर्णपणे म्बुलन्स जळून जाण्याची घटना घडली.

एम एच १४ सी एल ०५५४ ही म्बुलन्स सावंतवाडीहून एका पेशंटला घेऊन तातडीने बांबोळी हॉस्पिटलमध्ये जात असताना धारगळ महाखाजन येथे म्बुलन्स मध्ये स्पार्क झाल्याचे लक्षात वाहन चालकाच्या आल्यामुळे त्याने वाहन बाजूला हलवले आणि त्वरित दोन मिनिटाच्या आत आतील पेशंट व इतरांना दुसऱ्या वाहनांमध्ये पाठवून त्यांची सोय केली. त्यानंतर लगेच या वाहनाने पूर्णपणे पेट घेऊन वाहन जळून गेले. घटनेची माहिती पेडणे अग्निशामन दलाला मिळतात पेडणे अग्निशामन दलाच्या जवानांनी बंबासहित घटनास्थळी धाव घेतली आणि आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये फायर फायटर म्हणून जयराम शेटगावकर, अलवारीस मास्कारांजस, जयराम कानोलकार, इंद्रकुमार परब, कृष्णा नाईक आणि बया वरक या जवानांनी बरीच परिश्रम घेऊन आग आटोक्यात आणली. परंतु पूर्णपणे वाहन जळून खाज झाले. मात्र जीवित हानी पूर्णपणे टळली.

एक मोठी दुर्घटना टाळण्याचे काम म्बुलन्स चालकाने प्रसंग ओळखून प्रयत्न केल्यामुळे मोठी दुर्घटना घडली नाही. अन्यथा दुर्दैवी प्रसंग घडला असता. अधून मधून वाहनाने शॉर्टसर्किट लागण्याच्या घटना घडत असून त्यामुळे वाहन चालकही आता भयभीत झाले आहेत.

---

# गुंडांकडून घर बळकावल्याचा आरोप

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १८ : हणजूण येथील एक घरावर झालेल्या हल्लयाच्या प्रकरणात राजेश सिनारी आणि त्याची मैत्रीण ब्रॉनविन सिनारी यांनी गंभीर आरोप केले आहेत. त्यांचा दावा आहे की, सुमारे ३०–४० 'गुंडांनी' त्यांच्या घरातील सर्व सामानाची नासधूस केली आणि घरातून सर्वकाही पळवून नेले.

शहरात झालेल्या पत्रकार परिषदेत ब्रॉनविन सिनारी यांनी सांगितले की ही घटना शनिवारी घडली. आम्हाला धमकीचे फोन येत होते, त्यामुळे आम्ही पोलिस तक्रार दाखल केली होती. आम्ही वकिलाच्या सल्लयानुसार घराबाहेर पडताना एका कोपऱ्यात तीन लोक बसले होते. धमकीचे फोन येत असल्याने मी सावध होते, असे त्या म्हणाल्या.

माझ्या शेजाऱ्यांना फोन केला, तेव्हा त्यांनी सांगितले की सुमारे १५ लोक माझ्या घराजवळ आहेत आणि आणखी काही लोक येत आहेत. काही वेळाने शेजाऱ्यांनी सांगितले की ते लोक घराच्या आवारात घुसले आहेत आणि दारावर ठोठावत आहेत. दुसऱ्या शेजाऱ्याने सांगितले की पिस्तूल आणि चाकू घेऊन सुमारे ३० लोक आले आहेत आणि त्यांनी दार तोडले, असे ती पुढे म्हणाली.

सोमवारी जनार्दन खोराटे यांनी पत्रकार परिषदेत आरोप केला की राजेश सिनारी आणि ब्रॉनविन यांनी घर बेकायदेशीरपणे ताब्यात घेतले होते. घराचे मूळ मालक मायकेल पीटर्स यांनी यावर आपली प्रतिक्रिया दिली. एक व्हिडिओ जारी करत त्यांनी सांगितले की ते सध्या यूकेमध्ये प्रोस्टेट कर्करोगावर उपचार घेत आहेत आणि हणजूण मधील घर विक्रीसाठी नाही.

मी मायकेल पीटर्स आहे आणि माझे घर हणजूण येथील मायकेल वाडा येथे ७७८ क्रमांकाचे आहे. आणि ते विक्रीसाठी नाही. मी गोवा पोलिसांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की राजेश सिनारी आणि त्यांची पत्नी ब्रॉनविन माझे घर बेकायदेशीरपणे विकण्याचा प्रयत्न करत आहेत, असे मायकेल पीटर्स यांनी व्हिडिओमध्ये म्हटले आहे.

जनार्दन खोराटे यांनी देखील आरोप केला की राजेश आणि ब्रॉनविन घरात बेकायदेशीरपणे राहून निराधार आरोप करत आहेत. जर त्यांच्याकडे काही योग्य कागदपत्रे असतील तर ते आम्हाला दाखवू शकतात. आम्ही फोनवर चर्चा केली होती आणि ब्रॉनविन बाहेर पडण्यास तयार होती, मात्र राजेश सिनारी यांनी मला धमकी दिली की तो बाहेर पडणार नाही, असे खोराटे यांनी सांगितले.गोवा पोलिसांनी या प्रकरणी तपास सुरू केला आहे

---

# एफडीएचे कळंगुट आणि बागा येथील काजू दुकांनावर छापे

■ टीम दैनिक हेराल्ड

**कळंगुट, दि. १८** : अन्न आणि औषध प्रशासनाने (एफडीए) मंगळवारी कळंगुट आणि बागा येथील काजू विकणाऱ्या तीन दुकांनावर छापे टाकले. हे छापे निकृष्ट उत्पादनांच्या विक्रीविरोधात सुरू असलेल्या मोहिमेचा एक भाग होते.

एफडीए अधिकाऱ्यांनी सांगितले की, छापेमारी दरम्यान बालाजी काजू, पी. पटेल काजू आणि गोवा काजू हाऊस या तीन दुकांनामध्ये गुणवत्ता निकषांचे उल्लंघन आढळले. विक्रेते पॅकेटच्या बाहेरील बाजूस उच्च दर्जाचे काजू दाखवून आत निकृष्ट काजू लपवत होते. यामुळे ग्राहकांची दिशाभूल होऊ शकते. त्याचप्रमाणे, वजनाच्या मापाशी छेडछाड करून कमी वजनाचे पॅकेट तयार केले जात होते. शिळे काजू देखील पॅक करण्यात आले होते, असे एफडीए अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

तिन्ही दुकानदारांविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. एफडीए अधिकाऱ्यांनी सांगितले की, ग्राहकांना फक्त दर्जेदार उत्पादनच विकले जावेत यासाठी दर दोन आठवड्यांनी छापे टाकले जात आहेत. पर्यटकांना विकल्या जाणाऱ्या काजूंचा दर्जा चांगला असावा लागतो, कारण यामुळे राज्याची प्रतिमा प्रभावित होऊ शकते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले .

एफडीए टीमचे नेतृत्व उत्तर गोव्यातील अधिकारी रिचर्ड नोरोन्हा यांनी केले, तर बार्देश येथील नोंदणी अधिकारी राजाराम पाटील आणि अन्न सुरक्षा अधिकारी अमित मांद्रेकर, साफिया खान, आणि लेनिन दे सा यांचाही त्यात समावेश होता.

---

# बेकायदेशीर भंगार अड्ड्यांवर कारवाईला सुरुवात

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १८** : महानगरपालिकेने (पीएमसी) शहरातील चार बेकायदेशीर भंगारअड्ड्यांवर कारवाई सुरू केली. न्यायालयाने परवानगी दिल्यानंतर वरखंडे येथील हनुमान मंदिराजवळील एक बेकायदेशीर भंगारगोडाऊन पाडले. गेल्या महिन्यातही वरखंडे येथे एक भंगारगोडाऊन पाडण्यात आले.

महानगरपालिकेचे अभियंता (एमई) विशांत नाईक यांच्या मते, बेकायदेशीर भंगारकाम साफ करण्याविरुद्ध परिषदेने बराच काळ ठराव घेतला आहे काही पाडण्यात आले आहेत तर काही न्यायालयात गेले आहेत. अलीकडेच कलम १८४ अंतर्गत उपजिल्हाधिकाऱ्यांनी वरखंडे येथील भंगारकाम पाडण्याचे निर्देश दिले होते, त्यानुसार महानगरपालिकेच्या पथकाने बेकायदेशीर भंगारकामाची एक शेड पाडली. भंगारकाम चालकाला त्याच्या प्लास्टिकच्या पिशव्या इत्यादी साफ करण्यासाठी आणि भंगारकामाचा परिसर मोकळा करण्यासाठी



पंधरा दिवसांचा वेळ देण्यात आला आहे.

महानगरपालिकेचे अध्यक्ष आनंद नाईक म्हणाले की, भंगारकाम मालकाने न्यायालयात धाव घेतल्याने कारवाईला विलंब झाला, परंतु आता न्यायालयाने भंगारकाम पाडण्याचे आदेश दिले आहेत. शहरातील भंगारकाम करणाऱ्या जागा रहिवाशांसाठी आणि महामार्गांसाठी धोकादायक असल्याने चारही बेकायदेशीर भंगारकाम करणाऱ्या जागा साफ करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. ढवळी भंगारकाम करणाऱ्या जागा महामार्गावर पसरल्या होत्या ज्यामुळे अधिकाऱ्यांना दोन दिवसांपासून इतर रस्त्यांवरून वाहतूक वळवावी लागली होती. तेव्हापासून फोंडा तालुक्यातील लोक परिसरातील भंगारकाम करणाऱ्या जागा साफ करून रहिवाशांच्या सुरक्षिततेसाठी त्यांना निवासी क्षेत्रापासून किंवा औद्योगिक क्षेत्रातून हलवण्याची मागणी करत आहेत.

---

# बोरी–शिरोडा येथे वायू प्रदूषणाचा मुद्दा गंभीर

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १८** : बोरी–शिरोडा येथील खाणकामाशी संबंधित उत्पादनांवर प्रक्रिया करणाऱ्या एका कंपनीमधून निघणाऱ्या धुरामुळे परिसरात वायू प्रदूषण वाढत असल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे.तारवळ शिरोडा, खाजोर्डा, वाजे, तिशे बोरी आणि इतर भागातील नागरिकांनी या समस्येबाबत तीव्र संताप व्यक्त केला असून, कंपनीने तातडीने उपाययोजना न केल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.

स्थानिकांनी सांगितले की, फक्त वायू प्रदूषणच नव्हे, तर दिवसरात्र होणाऱ्या प्रचंड आवाजामुळेही नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्वरीत तपासणी करावी आणि कंपनीबाबत कोणते निर्णय घेतले जाणार आहेत, याची माहिती रहिवाशांना द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. रहिवाशांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की,३१ मार्चपर्यंत जर ठोस पावले उचलली नाहीत, तर आम्ही न्यायालयात जाण्यास बाध्य होऊ.

प्रदूषणाच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी स्थानिक ग्रामस्थ एकत्र आले आहेत. गावातील धनराज नाईक यांनी सांगितले की,कंपनी बोरी–शिरोडाच्या मध्यवर्ती भागात असल्याने नागरिकांना वायू, जल आणि ध्वनी प्रदूषणाचा मोठा त्रास होत आहे. प्रदूषित हवेमुळे आरोग्यास गंभीर धोके निर्माण होत आहेत. कंपनीने योग्य ती प्रदूषणविरोधी उपाययोजना केलेली नाही, त्यामुळे घरांमध्ये धोकादायक धूळ आणि विषारी घटक पोहोचत आहेत. कंपनीने स्थानिकांच्या आरोग्याशी खेळू नये.

गावकऱ्यांनी शांततापूर्ण निषेध नोंदवला असला, तरी ३१ मार्चनंतर परिस्थिती सुधारली नाही, तर मोठे आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा मनिला शिरोडकर यांनी दिला. आंदोलनाच्या तयारीसाठी शिरोडा गावातील रहिवासी कंपनीसमोर एकत्र आले होते.

दरम्यान, कंपनीच्या अधिकाऱ्यांनी या आरोपांवर प्रतिक्रिया देत सुरक्षिततेचे योग्य उपाय यापुढे राबवले जातील,असे आश्वासन दिले आहे. अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की,सरकारी नियमांनुसार, अधिकाऱ्यांनी तपासणी अहवाल सादर करावा लागेल. नवीन धोरणांतर्गत आम्हाला पाच सुधारणा करण्याचे आदेश देण्यात आले असून, ३१ मार्चपर्यंत आवश्यक ती पावले उचलली जातील.

सरकारी आदेशानुसार ३१ मार्चपर्यंत प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक ती सुधारणा केल्या जातील, असे कंपनी प्रशासनाने सांगितले असले तरी, स्थानिक नागरिक या आश्वासनांवर समाधानी नाहीत. जर ठोस कारवाई झाली नाही, तर न्यायालयीन लढाई आणि तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. –या संपूर्ण प्रकरणाकडे आता प्रशासन कोणत्या पद्धतीने पाहते आणि पुढील कार्यवाही कशी होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

# १० लाखांच्या सोन्याच्या दागिन्यांच्या चोरीप्रकरणी दोघांना अटक

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १८ :** कोलवा पोलिसांनी कर्नाटकमधील गुड्डे कुंकुंदूर येथील कासिम आणि फयाज यांना १० लाख रुपयांच्या सोन्याच्या दागिन्यांच्या चोरी प्रकरणी अटक केली आहे. हा प्रकार वार्का येथील एका स्टार हॉटेलमध्ये घडला होता. आरोपींनी हॉटेलचा गॅलरी दरवाजा तोडून चोरी केली होती.

कोलवा पोलिस ठाण्यात चोरीसंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला होता, ज्यामध्ये आरोपीच्या सांगण्यावरून चोरीची मालमत्ता जप्त करण्यात आली. पोलिसांनी सांगितले की, आरोपी कासिमच्या चौकशी दरम्यान त्याने इतर चोरीच्या प्रकरणात सहभागी असल्याचे कबूल केले. त्याच्याच सांगण्यावरून, वार्का येथील हॉटेलमधून चोरीच्या मालमत्तेची माहिती उघडकीस आली.

आरोपी कासिमने पोलिसांना सांगितले की, चोरीचे सोन्याचे दागिने त्याने आपल्या मित्र एसएम प्रदीप याला दिले. प्रदीप कर्नाटकमधील सकलेशपूर येथील रहिवासी आहे. प्रदीपने सोन्याचे दागिने ८५,000 रुपयांना घेतले होते, कारण कासिम आर्थिक संकटात होता. हे दागिने त्याच्या पत्नी आणि मुलीचे असल्याचे प्रदीपने पोलिसांना सांगितले.

कोलवा पोलिसांनी प्रदीपला कर्नाटकमध्ये पकडण्यासाठी पथक पाठवले आणि सकलेशपूर पोलिसांच्या मदतीने त्याला ताब्यात घेतले. प्रदीपने दागिन्यांची थोडक्यात माहिती दिली, ज्यात १ चेन, १ नेकलेस, ४ जोड्या कानातले आणि २ बोटांच्या बोटांचा समावेश होता. या दागिन्यांची किंमत अंदाजे १0 लाख रुपये आहे.

पोलिसांनी प्रदीपच्या विरोधात कलम ३५ (३) बीएनएसएस अंतर्गत नोटीस बजावली असून, त्याला कोलवा पोलिस ठाण्यात हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत.